www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide

Test Booklet Code & Serial No.
प्रश्नपत्रिका कोड व क्रमांक

**D**

# Paper-II
# MARATHI

**Signature and Name of Invigilator**

1. (Signature) .........................................

(Name) .................................................

2. (Signature) .........................................

(Name) .................................................

Seat No. | | | | | | |

(In figures as in Admit Card)

Seat No. ..............................................................

(In words)

OMR Sheet No. | | | | | | |

(To be filled by the Candidate)

## JUN - 01219

**Time Allowed : 2 Hours]** **[Maximum Marks : 200**

Number of Pages in this Booklet : **20** Number of Questions in this Booklet : **100**

**Instructions for the Candidates**

1. Write your Seat No. and OMR Sheet No. in the space provided on the top of this page.
2. This paper consists of **100** objective type questions. Each question will carry *two* marks. *All* questions of Paper II will be compulsory.
3. At the commencement of examination, the question booklet will be given to the student. In the first 5 minutes, you are requested to open the booklet and compulsorily examine it as follows :
   (*i*) To have access to the Question Booklet, tear off the paper seal on the edge of this cover page. Do not accept a booklet without sticker-seal or open booklet.
   (*ii*) Tally the number of pages and number of questions in the booklet with the information printed on the cover page. Faulty booklets due to missing pages/questions or questions repeated or not in serial order or any other discrepancy should not be accepted and correct booklet should be obtained from the invigilator within the period of 5 minutes. Afterwards, neither the Question Booklet will be replaced nor any extra time will be given. The same may please be noted.
   (*iii*) After this verification is over, the OMR Sheet Number should be entered on this Test Booklet.
4. Each question has four alternative responses marked (A), (B), (C) and (D). You have to darken the circle as indicated below on the correct response against each item.
   **Example :** where (C) is the correct response.
   (A) (B) ● (D)
5. Your responses to the items are to be indicated in the **OMR Sheet given inside the Booklet only.** If you mark at any place other than in the circle in the OMR Sheet, it will not be evaluated.
6. Read instructions given inside carefully.
7. Rough Work is to be done at the end of this booklet.
8. If you write your Name, Seat Number, Phone Number or put any mark on any part of the OMR Sheet, except for the space allotted for the relevant entries, which may disclose your identity, or use abusive language or employ any other unfair means, you will render yourself liable to disqualification.
9. You have to return original OMR Sheet to the invigilator at the end of the examination compulsorily and must not carry it with you outside the Examination Hall. You are, however, allowed to carry the Test Booklet and duplicate copy of OMR Sheet on conclusion of examination.
10. Use only Blue/Black Ball point pen.
11. Use of any calculator or log table, etc., is prohibited.
12. There is no negative marking for incorrect answers.

**विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाच्या सूचना**

1. परिक्षार्थींनी आपला आसन क्रमांक या पृष्ठावरील वरच्या कोपऱ्यात लिहावा. तसेच आपणांस दिलेल्या उत्तरपत्रिकेचा क्रमांक त्याखाली लिहावा.
2. सदर प्रश्नपत्रिकेत 100 बहुपर्यायी प्रश्न आहेत. प्रत्येक प्रश्नास **दोन** गुण आहेत. या प्रश्नपत्रिकेतील **सर्व** प्रश्न सोडविणे अनिवार्य आहे.
3. परीक्षा सुरू झाल्यावर विद्यार्थ्याला प्रश्नपत्रिका दिली जाईल. सुरुवातीच्या 5 मिनीटांमध्ये आपण सदर प्रश्नपत्रिका उघडून खालील बाबी अवश्य तपासून पहाव्यात.
   (*i*) प्रश्नपत्रिका उघडण्यासाठी प्रश्नपत्रिकेवर लावलेले सील उघडावे. सील नसलेली किंवा सील उघडलेली प्रश्नपत्रिका स्विकारू नये.
   (*ii*) पहिल्या पृष्ठावर नमूद केल्याप्रमाणे प्रश्नपत्रिकेची एकूण पृष्ठे तसेच प्रश्नपत्रिकेतील एकूण प्रश्नांची संख्या पडताळून पहावी. पृष्ठे कमी असलेली/कमी प्रश्न असलेली/प्रश्नांचा चुकीचा क्रम असलेली किंवा इतर त्रुटी असलेली सदोष प्रश्नपत्रिका सुरुवातीच्या 5 मिनिटातच पर्यवेक्षकाला परत देऊन दुसरी प्रश्नपत्रिका मागवून घ्यावी. त्यानंतर प्रश्नपत्रिका बदलून मिळणार नाही तसेच वेळही वाढवून मिळणार नाही याची कृपया विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.
   (*iii*) वरीलप्रमाणे सर्व पडताळून पाहिल्यानंतरच प्रश्नपत्रिकेवर ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेचा नंबर लिहावा.
4. प्रत्येक प्रश्नासाठी (A), (B), (C) आणि (D) अशी चार विकल्प उत्तरे दिली आहेत. त्यातील योग्य उत्तराचा रकाना खाली दर्शविल्याप्रमाणे ठळकपणे काळा/निळा करावा.
   **उदा. :** जर (C) हे योग्य उत्तर असेल तर.
   (A) (B) ● (D)
5. या प्रश्नपत्रिकेतील प्रश्नांची उत्तरे **ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेतच दर्शवावीत.** इतर ठिकाणी लिहिलेली उत्तरे तपासली जाणार नाहीत.
6. आत दिलेल्या सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात.
7. प्रश्नपत्रिकेच्या शेवटी जोडलेल्या कोऱ्या पानावरच कच्चे काम करावे.
8. जर आपण ओ.एम.आर. वर नमूद केलेल्या ठिकाणा व्यतिरिक्त इतर कोठेही नाव, आसन क्रमांक, फोन नंबर किंवा ओळख पटेल अशी कोणतीही खूण केलेली आढळून आल्यास अथवा असभ्य भाषेचा वापर किंवा इतर गैरमार्गांचा अवलंब केल्यास विद्यार्थ्याला परीक्षेस अपात्र ठरविण्यात येईल.
9. परीक्षा संपल्यानंतर विद्यार्थ्याने मूळ ओ.एम.आर. उत्तरपत्रिका पर्यवेक्षकांकडे परत करणे आवश्यक आहे. तथापि, प्रश्नपत्रिका व ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेची द्वितीय प्रत आपल्याबरोबर नेण्यास विद्यार्थ्यांना परवानगी आहे.
10. फक्त निळ्या किंवा काळ्या बॉल पेनचाच वापर करावा.
11. कॅलक्युलेटर किंवा लॉग टेबल वापरण्यास परवानगी नाही.
12. चुकीच्या उत्तरासाठी गुण कपात केली जाणार नाही.

www.prepp.in

www.prepp.in
Prepp
Your Personal Exams Guide



# Marathi
## Paper II
# मराठी
## प्रश्नपत्रिका II

**Time Allowed : 120 Minutes]** **[Maximum Marks : 200**

**Note :** This Paper contains **Hundred (100)** multiple choice questions. Each question carrying **Two (2)** marks. Attempt *All* questions.

**सूचना :** या प्रश्नपत्रिकेत एकूण **शंभर (100)** बहुपर्यायी प्रश्न दिलेले आहेत. प्रत्येक प्रश्नाला **दोन (2)** गुण आहेत. **सर्व** प्रश्न सोडवा.

1. "दलित साहित्याला जशी स्वत:ची भूमिका आहे, व्याप्ती आहे, आशयघनता आहे, व्यापकता आहे किंवा शोषणपरंपरेच्या पार्श्वभूमीवर वर्णवर्चस्वाखाली रगडल्या गेलेल्या मनाचा ठोसपणे हुंकार आहे तसे काही ग्रामीण साहित्याला आहे का ?" असा प्रश्न कोणी उपस्थित केला होता ?

   (A) रा.रं. बोराडे

   (B) भास्कर चंदनशिव

   (C) महावीर जोंधळे

   (D) चंद्रकुमार नलगे

2. शेतकरी चळवळीत सक्रिय राहून ग्रामीण साहित्य निर्मिती करणारे लेखक कोण ?

   (A) बी. रघुनाथ

   (B) सदानंद देशमुख

   (C) रा.रं. बोराडे

   (D) भास्कर चंदनशिव

3. 1981चे तिसरे ग्रामीण साहित्य संमेलन कुठे आयोजित करण्यात आले होते ?

   (A) कोपरगाव

   (B) औरंगाबाद

   (C) प्रवरानगर

   (D) धुळे

4. 'दोन क्रांतिवीर' हे पुस्तक कोणी लिहिले आहे ?

   (A) व्यंकटेश आत्राम

   (B) एकनाथ साळवे

   (C) माधव सरकुंडे

   (D) गोविंद गारे

5. दुसरे आदिवासी साहित्य संमेलन कुठे पार पडले ?

   (A) यवतमाळ

   (B) वणी

   (C) चंद्रपूर

   (D) भद्रावती

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



6. 'दलित साहित्याचे निराळेपण' हा ग्रंथ कोणी लिहिला आहे ?
   (A) बाबुराव बागूल
   (B) प्रभाकर मांडे
   (C) दत्ता भगत
   (D) यशवंत मनोहर

7. 'दलित आदिवासी ग्रामीण' साहित्य संमेलन कुठे आयोजित करण्यात आले होते ?
   (A) वैजापूर
   (B) येवला
   (C) कोपरगाव
   (D) साक्री

8. 'खोली पाहिजे' हे कामगारांच्या घरांच्या समस्या मांडणारे नाटक कोणी लिहिले ?
   (A) ग.कृ. जोशी
   (B) मा.कृ. जोशी
   (C) नागेश जोशी
   (D) वसंत दुदवाडकर

9. पुढीलपैकी कोणत्या लेखिकेची ओळख स्त्रीवादी लेखिका म्हणून **नाही** ?
   (A) नीरजा
   (B) आशा बगे
   (C) प्रज्ञा दया पवार
   (D) अश्विनी धोंगडे

10. आंबेडकरी विचार पचवलेला आणि त्या विचाराचे भक्कम पाठबळ लाभलेला 'सूर्यलिपी' हा काव्यसंग्रह कुणाचा ?
   (A) केशव मेश्राम
   (B) शरणकुमार लिंबाळे
   (C) शशिकांत हिंगोणेकर
   (D) भास्कर कांबळे

11. नागरजीवनातील उच्चमध्यमवर्गाच्या स्खलनशीलतेचे चित्रण करणारी कादंबरी कोणती ?
   (A) अंधारवाटा
   (B) अदेशी
   (C) उद्ध्वस्त
   (D) बोनसाय

www.prepp.in
Prepp
Your Personal Exams Guide



12. जैन कवी आणि त्यांचे काव्यग्रंथ यांच्या योग्य जोड्या जुळवा :

**सूची-I**

(*i*) वीरनंदी

(*ii*) हरिश्चंद्र

(*iii*) धनंजय

(*iv*) वाग्भट्ट

**सूची-II**

(1) यशोधर काव्य

(2) नेम निवार्ण

(3) धर्मशर्माभ्युदय

(4) चंद्रप्रभावर्णन

(5) द्विसंधान

**संहिता :**

(A) (*i*)–(2), (*ii*)–(3), (*iii*)–(5), (*iv*)–(1)

(B) (*i*)–(3), (*ii*)–(5), (*iii*)–(4), (*iv*)–(2)

(C) (*i*)–(4), (*ii*)–(4), (*iii*)–(5), (*iv*)–(2)

(D) (*i*)–(5), (*ii*)–(2), (*iii*)–(3), (*iv*)–(1)

13. पूर्वास्पृश्य महार व मांग या जातींमधील अंतर्गत संघर्षाचे चित्रण करणारी कादंबरी कोणती ?

(A) जातीला जात वैरी

(B) मेलेलं पाणी

(C) माझं गाव कुठाय ?

(D) इस्कोट

14. पुढील ग्रंथांचा कालक्रम सांगा :

(1) भामह : 'काव्यालंकार'

(2) वामन : 'काव्यालंकारसूत्रवृत्ति'

(3) दण्डी : 'काव्यादर्श'

(4) उद्‌भट : 'काव्यालंकारसारसंग्रह'

(A) (1)—(3)—(2)—(4)

(B) (1)—(2)—(3)—(4)

(C) (1)—(3)—(4)—(2)

(D) (2)—(1)—(4)—(3)

15. वामनाने कोणती दोन प्रयोजने मानली ?

(A) यश व अर्थप्राप्ती

(B) धर्म व अर्थ

(C) अशुभनिवारण व कान्तासम्मिततयोपदेश

(D) प्रीति व कीर्ति

16. 'काव्यस्यात्मा ध्वनि:' ह्या व्याख्येनुसार 'ध्वनि' हा काव्याचा आत्मा मानलेला आहे. मग स्वभावोक्तीचे स्थान कोणते ?

(A) ते काव्य ठरणार नाही.

(B) त्याचे रचनासौंदर्य लक्षणीय असते ?

(C) त्यातही ध्वनीचा शोध घेता येतो ?

(D) त्यातील शब्दालंकार महत्त्वाचे असतात.

www.prepp.in
Prepp Your Personal Exams Guide



17. पुढीलपैकी कोणत्या समीक्षकाने भक्तिरसाचा पुरस्कार केला ?
(A) रूपगोस्वामी
(B) जगन्नाथ
(C) विश्वनाथ
(D) मम्मट

18. करुण रसाचा अनुभव सुखदु:खमिश्रित असतो असे कोणाचे मत आहे ?
(A) गुणचंद्र व रामचंद्र
(B) भरत
(C) अभिनवगुप्त
(D) विश्वनाथ

19. पुढीलपैकी कोणत्या समीक्षकाने रसप्रक्रियेत अनुकरणाला स्थान दिले ?
(A) श्री शंकुक
(B) भट्ट लोल्लट
(C) अभिनवगुप्त
(D) अप्पय्यदीक्षित

20. 'बचंगे तो और बी लढेंगे' हा प्रसंग कोणत्या बखरीमधील आहे ?
(A) भाऊसाहेबांची बखर
(B) महिकावतीची बखर
(C) शिंदेशाही बखर
(D) राक्षसतागडीची

21. छ. राजाराम यांच्या आज्ञेने जिंजी येथे कोणत्या बखरीचे लेखन केले आहे ?
(A) श्री शिवदिग्विजय
(B) सभासदी बखर
(C) महिकावतीची बखर
(D) एक्क्याण्णव कलमी बखर

22. 'काय सांगू तारीफ सये जणू इंद्र बैसला सभे वीरासन घालून ग, भवते देशोदेशिचे सुभे' ही रचना कोणत्या शाहीराची आहे ?
(A) होनाजी बाळा
(B) अनंत फंदी
(C) पट्टे बापूराव
(D) सगन भाऊ

www.prepp.in
Prepp
Your Personal Exams Guide



23. 'स्पंदकारिका' या ग्रंथाचा कर्ता कोण ?
(A) उत्पलाचार्य
(B) भट्ट कल्लुचार्य
(C) मम्मट
(D) रुद्रट

24. 'साहित्यसमीक्षा ही संज्ञा साहित्यशास्त्र व साहित्यसमीक्षा अशा दोन्ही अर्थाने वापरू नये' हे मत कोणी मांडले आहे ?
(A) रेने वेलेक
(B) प्लेटो
(C) ॲरिस्टॉटल
(D) रेमंड विल्यम्स

25. द.ग. गोडसे यांनी समीक्षेमध्ये कोणत्या नव्या संकल्पनेचे उपयोजन केले आहे ?
(A) मानुषता
(B) पोत
(C) सांस्कृतिक वर्चस्व
(D) लय

26. स्वप्नरचनेतील कोणता व्यापार हा साहचर्याच्या तत्त्वावर आधारलेला असतो ?
(A) मूल्यविवेक
(B) स्थानांतर
(C) प्रतीकनिर्मिती
(D) प्रतिमासृष्टी

27. 'नटसम्राट' पाहाताना मन भरून आले व डोळे पाणावले' हे विधान कोणत्या समीक्षा पद्धतीचे निदर्शक आहे ?
(A) रूपवादी
(B) मानसशास्त्रीय
(C) आस्वादक
(D) चरित्रात्मक

28. 'नाटकी निबंध' या लेखसंग्रहामध्ये कोणत्या समीक्षापद्धतीचे उपयोजन केले आहे ?
(A) ऐतिहासिक
(B) मानसशास्त्रीय
(C) आस्वादक
(D) मार्क्सवादी

29. 'नाट्यं भिन्नरुचैर्जनस्य बहुधाप्येकं समाराधनम्' हे लक्षण कोणी सांगितले आहे ?
(A) भरतमुनी
(B) मम्मट
(C) भवभूती
(D) कालिदास

30. 'चरित्रा'तील सत्याचे स्वरूप कशाप्रकारचे असते ?
(A) सार्वत्रिक
(B) वस्तुनिष्ठ
(C) व्यक्तिसापेक्ष
(D) शाश्वत

31. 'लिरिक इज मेटॅफर एक्स्टेंडेड' हा शब्दप्रयोग भावकवितेच्या संदर्भात कोणी योजला आहे ?
    (A) हर्बर्ट रीड
    (B) क्लाइव्ह बेल
    (C) ॲरिस्टॉटल
    (D) सी.डी. लेविस
32. लेखकाच्या व्यक्तिमत्त्वाचे कोणते वैशिष्ट्य 'रोजनिशी'तून प्रकर्षाने प्रकटते ?
    (A) व्यासंग
    (B) बहिर्मुखता
    (C) चिंतनशीलता
    (D) समाजाभिमुखता
33. 'पथनाट्या'च्या सादरीकरणाचे प्रमुख वैशिष्ट्य कोणते आहे ?
    (A) संदेशप्रवणता
    (B) अभिनयक्षमता
    (C) सांगीतिकता
    (D) लवचिकता
34. 'लंपन' ही व्यक्तिरेखा कोणी निर्मिली आहे ?
    (A) चिं.वि. जोशी
    (B) शरच्चंद्र चिरमुळे
    (C) प्रकाश नारायण संत
    (D) भा.रा. भागवत
35. 'कॉमिक एपिक पोएम इन प्रोझ' हे वर्णन कोणत्या साहित्यप्रकाराचे आहे ?
    (A) महाकाव्य
    (B) कविता
    (C) कादंबरी
    (D) शोकान्तिका
36. 'सभासदाची बखर' ही शिवकालावरील पहिली बखर असून, समकालीनाने शिवाजी महाराजांचे लिहिलेले पहिले चरित्र म्हणूनही अनन्यसाधारण महत्त्व आहे.
    (A) संपूर्ण विधान बरोबर
    (B) संपूर्ण विधान चूक
    (C) पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक
    (D) उत्तरार्ध बरोबर, पूर्वार्ध चूक
37. 'रमाकांत' हे पात्र पुढीलपैकी कोणत्या साहित्यकृतीतील आहे ?
    (A) एकच प्याला
    (B) गिधाडे
    (C) पायी चालणार
    (D) जेव्हा मी जात चोरली होती



Prepp Your Personal Exams Guide

www.prepp.in



38. "सरव्या पंढरीच्या नाथा। मज कृपा करी आता। ऐसे करी अखंडित। शुद्धनेम शुद्ध व्रत।"

— या अभंगाचा कर्ता कोण ?

(A) संत तुकाराम

(B) एकनाथ

(C) महदंबा

(D) संत जनाबाई

39. 'सूर्योदय बघायला जमलेली माणसं' ही कोणाची रचना आहे ?

(A) नामदेव ढसाळ

(B) अरुण कोल्हटकर

(C) प्रफुल्ल शिलेदार

(D) भालचंद्र नेमाडे

40. संत तुकारामांच्या वैकुंटगमणाच्या प्रसंगाचे चित्रण पुढीलपैकी कोणत्या साहित्यकृतीतून आले आहे ?

(A) पायी चालणार

(B) भिजकी वही

(C) आनंद ओवरी

(D) शोभायात्रा

41. केवळ लिखित/मुद्रित संहितेपेक्षा प्रत्यक्ष सादरीकरणामध्ये कोणत्या घटकामुळे अर्थामध्ये वेगळेपणा येतो ?

(A) वाचिक अभिनय

(B) शब्दयोजना

(C) वाक्यरचना

(D) लक्षणेचा वापर

42. भाषिक नियमोल्लंघन हे साहित्याच्या भाषेचे एक वैशिष्ट्य मानले जाते; मात्र त्यामुळे अभिव्यक्तीत अडथळा येण्याऐवजी सूक्ष्मता व वेगळेपणाच येतो.

(A) संपूर्ण विधान बरोबर

(B) पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक

(C) पूर्वार्ध चूक, उत्तरार्ध बरोबर

(D) संपूर्ण विधान चुकीचे

43. पुढीलपैकी कोणती सर्वनामे तृतीया विभक्तीत शून्य प्रत्यय घेतात ?

(A) प्रथमपुरुषी व द्वितीयपुरुषी

(B) प्रथमपुरुषी व तृतीयपुरुषी

(C) द्वितीयपुरुषी व तृतीयपुरुषी

(D) वरीलपैकी सर्व

44. '<u>वसंत आबाजी डहाके यांना</u> कुसुमाग्रज प्रतिष्ठानने जनस्थान पुरस्कार दिला.'

– या वाक्यातील अधोरेखित काय आहे ?

(A) कर्ता

(B) प्रत्यक्ष कर्म

(C) अप्रत्यक्ष कर्म

(D) विशेषण

45. पुढीलपैकी कोणता प्रकार सर्वनामाचा **नाही** ?

(A) पुरुषवाचक

(B) दर्शक

(C) समुदायवाचक

(D) संबंधी

46. पुढीलपैकी कोणता शब्दालंकार **नाही** ?

(A) यमक

(B) अनुप्रास

(C) अतिशयोक्ती

(D) चित्र

47. भाषाकुलाची संकल्पना पुढे येण्यास कोणत्या अधिवेशनातील निबंधवाचन कारणीभूत झाले ?

(A) इ.स. 1900 चे लिंग्विस्टिक सोसायटी ऑफ इंडियाचे अधिवेशन

(B) इ.स. 1876 चे बॉम्बे एज्युकेशन सोसायटीचे अधिवेशन

(C) इ.स. 1786 चे एशियाटिक सोसायटीचे अधिवेशन

(D) इ.स. 1786 चे लिंग्विस्टिक सोसायटीचे अधिवेशन

48. 'आईने दिवाळीसाठी करंज्या केल्या.'

– या वाक्यात किती पदिम आले आहेत ?

(A) चार

(B) पाच

(C) सहा

(D) नऊ

49. ऐतिहासिक भाषाभ्यासपद्धतीचे उद्दिष्ट काय असते ?

(A) भाषिक परिवर्तनाचा अभ्यास व भाषिक पुनर्रचना

(B) मानवी भाषेच्या उगमाविषयीचे सिद्धांत

(C) भाषांच्या इतिहासाच्या आधारे भविष्याबाबतचा अंदाज बांधणे

(D) भाषेच्या माध्यमातून समाजाचा इतिहास शोधणे

www.prepp.in

prepp
Your Personal Exams Guide



50. समाजभाषाविज्ञान ही शाखा पुढीलपैकी कशाचा अभ्यास करते ?
   (A) भाषेच्या सामाजिक संदर्भातील आविष्काराचा
   (B) भाषिक आविष्कारातील समाजाचा
   (C) भाषेच्या व्यवस्थेचा
   (D) वरील सर्व विषयांचा

51. विविध प्रादेशिक बोलींमध्ये भौगोलिक अंतरामुळे परस्पर आकलनक्षमता नसली, तरी एक स्थानिक बोली आणि प्रमाणभाषा यांच्यात परस्परांमध्ये आकलनक्षमता असते.
   (A) संपूर्ण विधान बरोबर
   (B) पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक
   (C) पूर्वार्ध चूक, उत्तरार्ध बरोबर
   (D) संपूर्ण विधान चुकीचे

52. माहिती तंत्रज्ञानामुळे वक्ता आणि श्रोता यांच्यातील स्थळाचेच नव्हे, तर काळाचेही अंतर मिटले आहे.
   (A) संपूर्ण विधान बरोबर
   (B) पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक
   (C) पूर्वार्ध चूक, उत्तरार्ध बरोबर
   (D) संपूर्ण विधान चूक

53. वारकरी कीर्तनात काल्यानंतर सादर केल्या जाणाऱ्या कलाप्रकारास काय म्हणतात ?
   (A) काल्याचे कीर्तन
   (B) भारूड
   (C) बोहाडा
   (D) लळीत

54. बोहाडा हे विधिनाट्य आहे, मात्र त्यात देवतावतरण, देवतासंचार, संचारी नृत्यनाट्य नसते.
   (A) संपूर्ण विधान बरोबर
   (B) पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक
   (C) उत्तरार्ध बरोबर, पूर्वार्ध चूक
   (D) संपूर्ण विधान चूक

55. "ज्यात भारलेले गूढ व्यक्त झाले आहे ते भारूड." अशी भारूडाची व्याख्या कोणी केली ?
   (A) ल.रा. पांगारकर
   (B) विनोबा भावे
   (C) वि.ल. भावे
   (D) ल.रा. नसिराबादकर

prepp
Your Personal Exam Guide

www.prepp.in
Prepp Your Personal Exams Guide



56. पुढीलपैकी कोणते नियतकालिक साहित्य महामंडळाच्या घटक संस्थेमार्फत चालवले जाते ?

(A) दक्षिण महाराष्ट्र साहित्य पत्रिका

(B) मुक्तशब्द

(C) पंचधारा

(D) अक्षरवाङ्मय

57. "भोळ्या भाबड्या, श्रद्धाळू, गतानुगतिक व अज्ञ सामान्य जनांना ज्ञानाचा नवा प्रकाश देण्याऐवजी त्यांची पारंपरिक श्रद्धास्थानेच बळकट करण्याचा प्रयत्न श्रीधर कवीने केला." हे मत कोणाचे आहे ?

(A) यू.म. पठाण

(B) गं.बा. सरदार

(C) भगवंतराव देशमुख

(D) श्री.ना. बनहट्टी

58. कोणत्या कीर्तन प्रकारांत आख्यान नसते ?

(A) कोणत्याच कीर्तनात आख्यान नसते

(B) वारकरी कीर्तन

(C) समर्थ कीर्तन

(D) नारदीय कीर्तन

59. "व्हा, व्हा सावध, उठा बंधूनो, सूर्य उदय झाला।
सुधारणेची प्रभा फाकली भारत खंडाला॥"

— ही रचना कोणाची आहे ?

(A) हरिभाऊ तोरणे

(B) भीमराव करडक

(C) किसन फागूजी बनसोडे

(D) गणेश आकाजी गवई

60. "एस.एम. जोशींसारखा साऱ्या देशावर प्रेम करणारा, लोकशाहीवर शंभर टक्के विश्वास असणारा, अहिंसा आणि सत्याग्रह ह्याविषयी आग्रही असणारा नेता संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनाला मिळाला, हे मराठी व भारतीय लोकांचे भाग्यच म्हटले पाहिजे."

— हे विधान कोणाचे आहे ?

(A) शाहीर लीलाधर हेगडे

(B) शाहीर इमाम शेख

(C) शाहीर कृष्णकांत जाधव

(D) शाहीर किसनराव हिंगे

Prepp
Your Personal Exams Guide



61. भक्तिप्रधान साहित्याची लोकप्रियता का वाढते आहे ?
   (A) शिक्षणाच्या वाढत्या प्रसारामुळे
   (B) लोकमानसातील तथाकथित धर्मभावनेची वाढ झाल्यामुळे
   (C) तंत्रज्ञानाचे लोकमानसावर झालेले आक्रमण
   (D) सुलभ व जलद मुद्रणव्यवस्थेमुळे

62. 'केसाळ काळंभोर पिल्लू', 'शामा' आणि 'निष्पर्ण वृक्षावर भर दुपारी' या साहित्यकृतींसंबंधी निर्माण झालेल्या वादळामागील समान कारण कोणते ?
   (A) दुर्बोधता
   (B) श्लील-अश्लीलते संबंधीची भूमिका
   (C) वेगवेगळ्या संघटनांचा विरोधी दृष्टिकोन
   (D) तत्कालीन शासनाची भूमिका

63. "राष्ट्रवादाचे स्वच्छंदतावादी स्वरूप आणि वाङ्मयेतिहासातील आधुनिक प्रवृत्ती यांच्यामध्ये निकटचा संबंध असल्यामुळे राष्ट्रीय साहित्याच्या संकल्पनेला जास्त वाव मिळत गेला" हे मत कुणाचे ?
   (A) रॉय पास्कल
   (B) एस्.एस्. प्रावर
   (C) रेने वेलेक
   (D) वसंत बापट

64. रत्नाकर मतकरी यांचे 'आरण्यंक' हे नाटक आणि धर्मवीर भारती यांचे 'अंधा युग' हे नाटक यांच्या तुलनेचा आधारतळ कोणता ?
   (A) समान तत्त्वप्रणाली
   (B) समान आधारसामग्री
   (C) समान प्रेरणास्थान
   (D) प्रभाव

65. 'विश्वसाहित्य' ही संकल्पना भारतात कोणी प्रथम मांडली ?
   (A) विनयकुमार सरकार
   (B) रवींद्रनाथ ठाकुर
   (C) अरविंद घोष
   (D) बुद्धदेव बोस

66. 'अभंग' या रचनाप्रकाराला काही अन्य प्रयोजनासाठी पुढीलपैकी कोणत्या कवीने नवीन रूप दिलेले **नाही** ?
   (A) बा.सी. मर्ढेकर
   (B) विंदा करंदीकर
   (C) अरुण कोलटकर
   (D) मधुकर केचे

67. 'यमुनापर्यटन' या पहिल्या भारतीय कादंबरीचा गौरव करताना भालचंद्र नेमाडे यांनी तिच्या कोणत्या गुणवैशिष्ट्यावर भर दिला आहे ?
   (A) समकालीन समाजचित्रण
   (B) नायिकेची कृतिशीलता
   (C) संवादांतील भाषा
   (D) चित्रमय वर्णन

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



68. भाषांतर करताना प्रादेशिक संदर्भ कसे अडचणीचे ठरतात याचे उदाहरण पुढीलपैकी कोणते ?

(A) केशवसुतांची 'नैर्ऋत्येकडील वारा' ही कविता

(B) कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर यांचे नाटक 'कीचकवध'

(C) हरी नारायण आपटे यांची कथा 'काळ तर मोठा कठीण आला'

(D) बाबा पदमनजी यांची कादंबरी 'यमुना पर्यटन'

69. मराठीमध्ये हायकू ह्या काव्यप्रकाराचा प्रारंभ कोणी केला ?

(A) ज्ञानेश्वर मुळे

(B) शिरीष पै

(C) केशवकुमार

(D) दत्तू बांदेकर

70. कार्ल मार्क्स यांची तत्त्वप्रणाली ही पुढीलपैकी कोणत्या साहित्याचे प्रेरणास्थान **नाही** ?

(A) ग्रेसची कविता

(B) विंदा करंदीकर यांची कविता

(C) डोस्टोव्हस्कीच्या कादंबऱ्या

(D) अरुंधती रॉय यांची कादंबरी 'गॉड ऑफ स्मॉल थिंग्ज'

71. "भारतीय साहित्य एकच आहे. परंतु ते अनेक भाषांमधून लिहिले जाते" हे कोणाचे वचन आहे ?

(A) बुद्धदेव भट्टाचार्य

(B) शिशिरकुमार दास

(C) अमिय देव

(D) डॉ. राधाकृष्णन्

72. 'मिल्टॉनिक सॉनेट' मधील काव्यगत आशयाची विभागणी ओळींच्या संदर्भात कशी असते ?

(A) दहा आणि चार

(B) आठ आणि सहा

(C) बारा आणि दोन

(D) नऊ आणि पाच

73. लोककथांचा तौलनिक अभ्यास करून त्याची सूची तयार करणारा फिनलँडचा अभ्यास कोण ?

(A) जेम्स फ्रॅरे

(B) सी.एस्. बर्न

(C) अँटी अर्ने

(D) फँज बोआस

74. ग्रंथ आणि ग्रंथकार यांच्या जोड्या जुळवा :

**सूची-I**

(*i*) लोकसाहित्य की भूमिका

(*ii*) लोकसाहित्य का अध्ययन

(*iii*) लोकसाहित्य

(*iv*) लोकसाहित्यविज्ञान

**सूची-II**

(1) विद्या चव्हाण

(2) सत्येंद्र

(3) कृष्णदेव उपाध्याय

(4) त्रिलोचन पांडे

(5) तोरू दत्त

**संहिता :**

(A) (*i*)–(4), (*ii*)–(2), (*iii*)–(5), (*iv*)–(5)

(B) (*i*)–(5), (*ii*)–(1), (*iii*)–(2), (*iv*)–(3)

(C) (*i*)–(3), (*ii*)–(4), (*iii*)–(1), (*iv*)–(2)

(D) (*i*)–(5), (*ii*)–(3), (*iii*)–(2), (*iv*)–(1)

75. 'Mythology is the disease of language' असा लोकसाहित्याच्या अभ्यासातील विचार कोणी मांडला ?

(A) जेकब ग्रिम

(B) विल्हेम ग्रिम

(C) फ्रिडरिक मॅक्सम्यूलर

(D) रॉबर्ट ब्राऊन

76. 'अपौरुषेय वाङ्मय' हा ग्रंथ कोणाचा आहे ?

(A) ना.रा. शेंडे

(B) अंबुबाई गोखले

(C) कमलाबाई देशपांडे

(D) सुशीलाबाई नवरे

77. "चातुर्वण्याचे स्वागत असो

धर्मांधतेचे स्वागत असो

विषमतेचे स्वागत असो

पण हे पशूपक्ष्यांनो

तुमचे मात्र स्वागत करता येत नाही

कारण तुमचा पाणवठा अलग अलग नाही."

— या ओळी कोणत्या कवीच्या आहेत ?

(A) प्रल्हाद चेंदवणकर

(B) लोकनाथ यशवंत

(C) त्र्यंबक सपकाळे

(D) अरुण काळे

78. 'हुंकार वेदनेचे' हा कवितासंग्रह कोणाचा आहे ?

(A) उषा भालेराव

(B) ज्योती लांजेवार

(C) उषा अंभोरे

(D) हिरा बनसोड

www.prepp.in
Prepp
Your Personal Exams Guide



79. "दलित आत्मकथने सामाजिक-सांस्कृतिक संघर्षाचे दस्तावेज होत तथापि रूढ मराठी आत्मचरित्राचे आवर्तन भेदण्याचे कार्य दलित आत्मकथनांनी केले आहे."

(A) संपूर्ण विधान चूक आहे

(B) संपूर्ण विधान बरोबर आहे

(C) विधानाचा पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक

(D) विधानाचा उत्तरार्ध बरोबर, पूर्वार्ध चूक

80. "विचारांचं वावडं नसलं तरी माझा पिंड वैचारिक नाही. सृजनशील लेखनाला वैचारिक बैठकीची आवश्यकता आहे असं मला कधीच वाटलं नाही" हे विधान कोणाचे ?

(A) व्यंकटेश माडगूळकर

(B) रा.रं. बोराडे

(C) उद्धव शेळके

(D) प्रतिभा इंगोले

81. कोणत्या कादंबरीला गांधीहत्येची पार्श्वभूमी आहे ?

(A) धग

(B) वावटळ

(C) टारफुला

(D) बनगरवाडी

82. "ना.सी. फडके यांच्या नागरी कथेचे आणि शैलीचे प्रतिबिंब ग.ल. ठोकळ यांच्या कथेत दिसते."
— हे विधान कोणाचे ?

(A) नागनाथ कोत्तापल्ले

(B) इंदुमती शेवडे

(C) वासुदेव मुलाटे

(D) भालचंद्र फडके

83. पुढीलपैकी कोणत्या दृष्टिकोनातून पूर्वीपासून वाङ्मयेतिहास लिहिला जात होता ?

(A) स्त्रीवादी

(B) व्यक्तिकेंद्री

(C) मार्क्सवादी

(D) विद्रोही

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



84. वाङ्मयाकडे पाहण्याचे नवे दृष्टिकोन, नव्या अर्थान्वयाच्या पद्धती सतत पुढे येत असल्या; तरी वाङ्मयेतिहासावर त्याचा परिणाम होण्याचे कारण नसते :

(A) संपूर्ण विधान बरोबर

(B) पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक

(C) पूर्वार्ध चूक, उत्तरार्ध बरोबर

(D) संपूर्ण विधान चुकीचे

85. सर्व इतिहास हा समकालीन इतिहासच असतो, ही भूमिका कोणाची ?

(A) हेगेल

(B) कांट

(C) क्रोचे

(D) इ.एच. कार

86. साहित्यकृतीला भूतकाळच नसतो. ती वर्तमानकाळात नांदणारी एक सार्वकालिक घटना असते. म्हणून अशाप्रकारच्या भूतकाळात जमा न होणाऱ्या अनन्यसाधारण, स्वायत्त वस्तूंचा इतिहास लिहिता येत नाही, अशी विचारसरणी कोणी मांडली ?

(A) डब्ल्यू.एच. केर

(B) रोमान इनगार्डेन

(C) वॉल्टर बेंजमिन

(D) डब्ल्यू.बी. येट्स

87. "एक देश भूमी थोर : एक देश मनुष्यें थोर : एक देश ऐश्वर्यें थोर : एक देश सामर्थ्यें थोर :" हा महाराष्ट्राचा गौरव कोणी केला ?

(A) चक्रधर

(B) भास्करभट्ट बोरीकर

(C) पंडित विश्वनाथ

(D) विश्वनाथबास बीडकर

www.prepp.in



88. पुढीलपैकी कोणता ग्रंथ एकनाथांनी लिहिला **नाही** ?

(A) भागवत

(B) भावार्थरामायण

(C) संक्षेपरामायण

(D) रुक्मिणीस्वयंवर

89. "बा मुनिदेया, हें थोर नगर : एथ तुम्ही चुकाल : बिढारासि जाओं या :" हे लीळाचरित्रातील — एकांकातील वर्णन कोणत्या नगराचे आहे ?

(A) पंढरपूर

(B) फलटण

(C) ऋद्धिपूर

(D) पैठण

90. धाव घाली विठू आता चालू नको मंद।
बडवे मज मारिती ऐसा काही अपराध॥
— असा धावा कोणी केला ?

(A) जनाबाई

(B) सोयराबाई

(C) मुक्ताबाई

(D) चोखामेळा

91. पुढीलपैकी कोणते चरित्र न.र. फाटक यांनी लिहिले **नाही** ?

(A) महादेव गोविंद रानडे

(B) कृ.प्र. खाडिलकर

(C) आगरकर

(D) आदर्श भारतसेवक

92. पुढीलपैकी सुबोध जावडेकर यांचा विज्ञानकथांचा संग्रह कोणता ?

(A) व्हर्चुअल रिॲलिटी

(B) दुसरा आइन्स्टाइन

(C) अंतराळातील भस्मासूर

(D) आकाशभाकिते

93. मराठी-मराठी पर्यायी शब्दांचा कोश कोणी सिद्ध केला ?

(A) प्र.न. जोशी

(B) वि.शं. ठकार

(C) द.ह. अग्निहोत्री

(D) मो.वि. भाटवडेकर

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



94. पुढीलपैकी वि.भि. कोलते लिखित आत्मचरित्र कोणते ?

(A) कृतज्ञ मी कृतार्थ मी

(B) अजून चालतोचि वाट

(C) आनंदयात्रा

(D) जडणघडण

95. पुढील काव्यसंग्रह प्रकाशनकालानुसार लिहा :

वनफूल, कविता, बोलगाणी, खूणगाठी.

(A) कविता, बोलगाणी, वनफूल, खूणगाठी

(B) कविता, वनफूल, खूणगाठी, बोलगाणी

(C) वनफूल, खूणगाठी, कविता, बोलगाणी

(D) वनफूल, बोलगाणी, कविता, खूणगाठी

96. खानोलकरांच्या कादंबरीत भावकाव्यात्म होण्याच्या शक्यता/क्षमता आहेत; तथापि भावकाव्यात्म कादंबरी लिहिणारे यशस्वी लेखक पु.शि. रेगे होत.

(A) संपूर्ण विधान बरोबर

(B) पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक

(C) उत्तरार्ध बरोबर, पूर्वार्ध चूक

(D) संपूर्ण विधान चूक

97. पुढीलपैकी अनंत काणेकर लिखित नाटक कोणते ?

(A) सरलादेवी

(B) उसना नवरा

(C) घरकुल

(D) आंधळ्यांची शाळा

98. 'निकाय' हे नियतकालिक कोणत्या साहित्य चळवळीशी संबंधित होते ?

(A) जनसाहित्य चळवळ

(B) लघुनियतकालिकांची चळवळ

(C) दलित साहित्य चळवळ

(D) आदिवासी साहित्य चळवळ

99. 1977 मध्ये ग्रामीण साहित्याचा पहिला मेळावा कुठे आयोजित करण्यात आला होता ?

(A) कोल्हापूर

(B) पुणे

(C) प्रवरानगर

(D) बारामती

100. यांत्रिकीकरणामुळे कृषिसंस्कृतीवर होणाऱ्या परिणामाचे चित्रण कोणत्या कादंबरीत आढळते ?

(A) टारफुला

(B) गोतावळा

(C) लिगाड आणि खांदेपालट

(D) आंबी

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



## ROUGH WORK

Prepp
Your Personal Exam Guide